बडतर्फीचा /निलंबन कालावधी नियमित करणे तसेच प्रतिक्षाधीन कालावधी मंजूर करण्याबाबत.

श्री.रशीद मुनीर शेख, तत्का.उपविभागीय वन अधिकारी, बीड.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग,मंत्रालय,

शासन आदेश क्र.एमएफएस-२०१९/प्र.क्र.१३३/फ-८

हुतात्मा राजगुरु चौक, मादामा कामा रोड, मुंबई ४०००३२.

दि. २०सप्टेबर , २०१९.

वाचा :- १) शासन ज्ञापन, महसूल व वन विभाग,क्र.एमएफएस-१७९१/प्र.क्र.४८/९१/फ-८, दि.१४/३/१९९१

२) शासन आदेश, महसूल व वन विभाग क्र.एमएफएस-१७९३/१०९३/प्र.क्र.१०८/फ-८ , दि.१४/१०/१९९३

३) शासन ज्ञापन, महसूल व वन विभाग क्र.एमएफएस-१७९१/प्र.क्र.४८/९१/फ-८, दि.२३/२/१९९३

४) शासन आदेश, महसूल व वन विभाग क्र.एमएफएस-१७९५/१०९३/प्र.क्र.१०८ (भाग-२)/फ-८ दि.१५/०२/२००८

५) शासन आदेश, महसूल व वन विभाग.क्र.एमएफएस-१६१२/२२१/प्र.क्र.०५/फ-८, दि.०९/०१/२०१३

६) मा.मंत्री (गृह निर्माण, खनिकर्म, कामगार) यांचे आदेश क्र.एमएफएस-२०१३/४०५/ प्र.क्र.७८(भाग-१) /फ-८ दि.२६/०८/२०१५.

शासन आदेश :-

श्री.रशीद मुनीर शेख हे उपविभागीय वन अधिकारी, बीड या पदावर कार्यरत असतांना चंदनाच्या लाकडाला बदली पास देण्याच्या प्रकरणी कर्तव्यच्युती केली तसेच विधान सभा तारांकित प्रश्नाची खोटी व अपूर्ण माहिती देऊन शासनाची दिशाभूल केल्याने, श्री.शेख यांना शासन ज्ञापन महसूल व वन विभाग क्र.एमएफएस-१७९१/प्र.क्र.४८/९१/फ-८, दि.१४.३.१९९१ अन्वये शासन सेवेतून निलंबित करण्यात आले. तद्नंतर शासन आदेश, महसूल व वन विभाग क्र.एमएफएस-१७९३/ १०९३/प्र.क्र.१०८/फ-८, दि.१४.१०.९३ अन्वये श्री.शेख यांना शासन सेवेत पुर्नस्थापित करण्यात आले.

२. सदरहू प्रकरणाबाबत श्री.रशीद मुनीर शेख यांच्याविरुध्द म.ना.से. (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम ८ खाली शासन ज्ञापन, महसूल व वन विभाग क्र.एमएफएस-१७९१/प्र.क्र.४८/९१/फ-८, दि.२३.२. १९९३ अन्वये विभागीय चौकशी आदेशित करण्यात आली. तसेच या प्रकरणी प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी, क्र.२, बीड यांच्या न्यायालयात फौजदारी खटला क्र.१/१९९२ दाखल करण्यात आला होता. त्यामध्ये श्री.रशीद मुनीर शेख यांना आरोपी करण्यात आले होते.

*सदर खटल्यामध्ये न्यायालयाने दि.८.४.१९९३ रोजी निकाल दिला असून*श्री.रशीद मुनीर शेख *यांना त्यांच्यावर ठेवण्यात आलेल्या आरोपातून दोषमुक्त करण्यात आले. न्यायालयाच्या सदर निर्णयाविरुध्द शासनातर्फे मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात अपील अर्ज क्र.२०९/९३ दाखल करण्यात आले. सदर अपीलावरील निर्णय प्रलंबित असतांना, वरील बाबी व प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी, क्र.२, बीड*

यांनी दिलेला निकाल विचारात घेऊन, श्री.रशीद मुनीर शेख *यांच्यावर शासन ज्ञापन दि.२३.२.९३ अन्वये बजाविण्यात आलेले दोषारोपपत्र मागे घेऊन, शासन ज्ञापन, म.व व.वि.क्र., एमएफएस-१७९३/१०९३/प्र.क्र.१०८/फ-८, दि.२३.३.१९९९ अन्वये सुधारित दोषारोपपत्र, जोडपत्र १ ते ४ सह बजाविण्यात आले व त्यांच्याविरुध्द म.ना.से. (शि.व अ.) नियम, १९७९ च्या नियम ८ खाली विभागीय चौकशी आदेशित करण्यात आली.*

३. उपरोक्त विभागीय चौकशीमध्ये प्रादेशिक विशेष अधिकारी, विभागीय चौकशी, औरंगाबाद यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. चौकशी अधिकाऱ्यांनी त्यांच्या चौकशी अहवालात श्री.शेख यांच्याविरुध्दचे दोषारोप सिध्द झाल्याचा निष्कर्ष काढला. श्री.रशीद मुनीर शेख यांच्याविरुध्द सिध्द झालेल्या दोषारोपाची गंभीरता लक्षात घेऊन त्यांना शासन सेवेतून बडतर्फ करण्याची शिक्षा बजाविण्याचा शासनाने निर्णय घेतला. सदर बडतर्फीच्या शिक्षेच्या प्रस्तावास सामान्य प्रशासन विभाग तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने सहमती दर्शविल्यानंतर श्री.रशीद मुनीर शेख यांना दि.२७/०२/२००८ च्या आदेशान्वये शासन सेवेतून बडतर्फ करण्यात आले.

४. श्री.रशीद मुनीर शेख, तका.उपविभागीय वन अधिकारी, बीड यांनी दि. ९.५.२००८ रोजी शासनाच्या सेवेतून बडतर्फीच्या दि.२७/०२/२००८ च्या आदेशाविरुध्द मा.राज्यपाल महोदयांकडे अपिल दाखल केले. सदर अपिलावर मा.राज्यपाल महोदयांच्यावतीने अपिल प्राधिकारी म्हणून मा.मंत्री (सहकार) यांनी दि. २०.८.२००९ रोजी सुनावणी घेतली. सदर सुनावणी मध्ये श्री.रशीद मुनीर शेख यांनी दाखल केलेले अपिल, महसूल व वन विभागाने सादर केलेले अभिप्राय तसेच प्रकरणातील संपूर्ण मूळ कागदपत्रे यांचे अवलोकन करुन तसेच अपिल कर्त्याचे म्हणणे ऐकून, श्री.रशीद मुनीर शेख अपचारी अधिकारी यांना दिलेली शिक्षा अयोग्य व फारच मोठी असल्याचे नमूद करून, मात्र त्यांच्याकडून सदरचे प्रकरण हाताळताना थोडासा निष्काळजीपणा झालेला असल्याचे व श्री.रशीद मुनीर शेख यांनी या प्रकरणी त्यांच्या अधिकाराखालील अधिकाऱ्यांच्या अहवालावर विसंबून राहणे अयोग्य असल्याचे निष्कर्ष काढले व अपिलीय प्राधिकाऱ्यानी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ मधील नियम २३ (२) (i) च्या अधिकारांचा वापर करुन दि.२८/०९/२००९ रोजी पुढील प्रमाणे आदेश दिले.

"श्री.रशीद मुनीर शेख , तत्का उप विभागीय वन अधिकारी, बीड यांना शासन आदेश क्र.एमएफएस-१७९५/ १०९३/ प्र.क्र.१०८/भाग-२/फ-८ दि. २७.२.२००८ अन्वये विभागीय चौकशी प्रकरणी अंतिम आदेश देवून शासन सेवेतून बडतर्फ करण्यात आल्याचा आदेश रद्द करण्यात येत आहे. मात्र पर्यवेक्षणामध्ये त्यांच्याकडून झालेली चूक विचारात घेता त्यांची एक वेतनवाढ दोन वर्षाकरीता भावी वेतनवाढीवर परिणाम न होता रोखण्यात यावी."

५. अपिलीय प्राधिकाऱ्यांचे वरील आदेश विचारात घेऊन त्याप्रमाणे शासनाच्या दि.६/०४/२०१० च्या आदेशान्वये श्री.रशीद मुनीर शेख यांना शासन सेवेतून बडतर्फ करण्याची शिक्षा देण्याबाबतचे दि.२७.२.२००८ चे शासन आदेश रद्द करून त्यांची **"एक वेतनवाढ २ वर्षाकरिता भावीवेतन वाढीवर परिणाम न करता रोखण्यात यावी "** अशी शिक्षा बजाविण्यात आली. तथापि त्यांना शासन सेवेत दि.२/०६/२०१० रोजी पदस्थापना देण्यात आली . त्यामुळे श्री.शेख यांना दि.२९/०९/२००९ ते ०२/०६/२०१० पर्यत पदस्थापनेविना राहवे लागले.

६. वरील पार्श्वभूमीवर श्री.रशीद मुनीर शेख यांचा दि.१४.३.१९९१ ते दि.१४.१०.१९९३ हा निलंबन कालावधी तसेच दि.१५.२.२००८ ते दि.२.६.२०१० हा शासन सेवेतून बडतर्फीमुळे झालेला सेवाबाह्य कालावधी नियमित करण्याबाबत म.ना.से. (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन बडतर्फी आणि सेवेतून काढून टाकणे

यांच्या काळातील प्रदाने) नियम, १९८१ मधील नियम ७२ (३) मधील तरतुदीनुसार शासनाने दि.०९/०१/२०१३ रोजी खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे :-

(अ) म.ना.से.(पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी, सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ च्या नियम ७२ (१) (ए) व (बी) मधील तरतुदीनुसार श्री.रशीद मुनीर शेख यांचा दि.१४.३.१९९१ ते दि.१४.१०.१९९३ हा निलंबन कालावधी, सेवानिवृत्तीचे प्रयोजन वगळता अन्य प्रयोजनार्थ, कामावर व्यतीत केलेला कालावधी न मानता तो निलंबन कालावधी म्हणून धरण्यात यावा व या निलंबन कालावधीमध्ये म.ना.से.(पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी, सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ च्या नियम ७२ (५) मधील तरतुदीनुसार, श्री.शेख यांना ते निलंबित झाले नसते तर त्यांना जे वेतन व भत्ते यांची अन्यथा जी रक्कम देय झाली असती त्याच्या ७५ % रक्कम अदा करण्यात यावी.

(ब) म.ना.से.(पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी, सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ च्या नियम नियम ७० (१) (ए) व (बी) मधील तरतुदीनुसार श्री.रशीद मुनीर शेख यांचा दि.१५.२.२००८ ते दि.२.६.२०१० हा सेवाबाहय कालावधी, सेवानिवृत्तीचे प्रयोजन वगळता अन्य प्रयोजनार्थ कर्तव्य कालावधी म्हणून धरण्यात येऊ नये व म.ना.से.(पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी, सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ च्या नियम ७० (४) मधील तरतुदीनुसार दि.१५.२.२००८ ते दि.२.६.२०१० या सेवाबाह्य कालावधीत श्री.रशीद मुनीर शेख यांना ते बडतर्फ झाले नसते तर त्यांना जे वेतन व भत्ते यांची अन्यथा जी रक्कम देय झाली असती त्याच्या ९०% रक्कम अदा करण्यात यावी.

७. श्री.रशीद मुनीर शेख यांनी दि.०९/०१/२०१३ रोजीच्या शासन आदेशाविरूध्द मा. राज्यपाल महोदयाकडे म.ना. से. (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम १७ ते २१ नुसार दि.१८.०२.२०१३ रोजीच्या पत्रान्वये अपील दाखल केले. सदर अपीलावर मा. मंत्री (गृह निर्माण खणीकर्म व कामगार) यांच्याकडे दि.०१.०७.२०१५ रोजी सुनावणी झाली. सदर सुनावणीअंती मा. मंत्री (गृह निर्माण खणीकर्म व कामगार) यांनी दि.२६.०८.२०१५ रोजी पुढीलप्रमाणे आदेश दिले.

अ) श्री.रशीद मुनीर शेख यांचा दि. १४.०३.१९९१ ते दि.१४.१०.१९९३ हा निलंबन कालावधी सेवानिवृत्तीचे प्रयोजन वगळता अन्य प्रयोजनार्थ निलंबन कालावधी म्हणून धरण्यात यावा व या निलंबन कालावधीमध्ये श्री.रशीद मुनीर शेख यांना शासनाच्या दि.०९.०१.२०१३ रोजीच्या आदेशान्वये मंजूर करण्यात आलेला ७५% रकमेत वाढ करून निलंबन कालावधीत त्यांना ९५% रक्कम अदा करण्यात यावी.

आ) श्री.रशीद मुनीर शेख यांचा दि. १५.०२.२००८ ते दि.०२.०६.२०१० हा सेवाबाहय कालावधीबाबत व तसेच या सेवाबाहय कालावधीतील वेतन व भत्ते याबाबत महसूल व वन विभागाने त्यांच्या दि.०९.०१.२०१३ रोजीच्या आदेशान्वये घेतलेला निर्णय कायम ठेवण्यात येत आहे.

८. श्री.रशीद मुनीर शेख , सेवानिवृत्त विभागीय वन अधिकारी यांनी मुळ अर्ज क्रमांक ७६९/२०१७ अन्वये त्यांचा दि.१४.०३.१९९१ ते दि.१४.१०.१९९३ या कालावधीचा निलंबन कालावधी तसेच दि.१५/०२/२००८ ते दि.०२/०६/२०१० या कालावधीतील बडतर्फ कालावधी कर्तव्य कालावधी म्हणून ग्राह्य धरण्यासंदर्भात महाराष्ट्र प्रशासकीय प्राधिकरण, मुंबई येथे अर्ज दाखल केला आहे. त्यावर सुनावणी होवून मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांनी दि.१६/७/२०१९ रोजी खालील प्रमाणे आदेश दिले आहे.

(A) The Original Application is allowed partly.

(B) The impugned order dated 26.08.2015 treating the period from 14.03.1991 to 14.10.1993 as suspension period for all purposes is quashed and set aside. It be treated duty period and he shall be paid full pay and allowances for the period of suspension.

(C) In so far as the period from 15.02.2008 to 02.06.2010 I,e. the period from dismissal to reinstatement is concerned. it be restricted to 15.02.2008 to 28.09.2009 and in this period, the Applicant will be entitled to 90% pay and allowances for the said period.

(D) Consequently, the period from 29.09.2009 to 02.06.2010 be treated as duty period with all Consequential service benefits.

(E) Respondent is directed to extend the monetary benefits to the Applicant, in above terms, within two months from today.

(F) No order as to costs.

९. न्यायालयाच्या निर्देशानुसार दिनांक २६/०८/२०१५ रोजीच्या शासन आदेशामध्ये श्री.रशीद मुनीर शेख यांचा निलंबन कालावधी नियमित करण्याबाबत म.ना.से. (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन बडतर्फी आणि सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम, १९८१ मधील नियम ७१ (३) मधील तरतुदीनुसार शासनाने पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे :-

(अ) म.ना.से.(पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी, सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ च्या नियम ७२ (३) मधील तरतुदीनुसार श्री.रशीद मुनीर शेख यांचा दि.१४.३.१९९१ ते दि.१४.१०.१९९३ हा निलंबन कालावधी, सर्व प्रयोजनार्थ कामावर व्यथीत केलेला कालावधी म्हणून मानण्यात येत आहे. श्री.रशीद मुनीर शेख यांना उक्त कालावधीतील पुर्ण वेतन व भत्ते अनुज्ञेय होतील.

(ब) म.ना.से.(पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी, सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ च्या नियम नियम ७० (१) (ए) व (बी) मधील तरतुदीनुसार श्री.रशीद मुनीर शेख यांचा दि.१५.२.२००८ ते दि.२८.९.२००९ हा सेवाबाहय कालावधी, सेवानिवृत्तीचे प्रयोजन वगळता अन्य प्रयोजनार्थ कर्तव्य कालावधी म्हणून धरण्यात येऊ नये व म.ना.से.(पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी, सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ च्या नियम ७० (४) मधील तरतुदीनुसार दि.१५.२.२००८ ते दि.२८.९.२००९ या सेवाबाह्य कालावधीत श्री.रशीद मुनीर शेख यांना ते बडतर्फ झाले नसते तर त्यांना जे वेतन व भत्ते यांची अन्यथा जी रक्कम देय झाली असती त्याच्या ९०% रक्कम अदा करण्यात यावी.

क) वरील परिच्छेद (ब) नमूद केल्याप्रमाणे सेवा बाह्य कालावधी नियमित केल्यानंतर श्री.रशीद मुनीर शेख यांचे बडतर्फीचे आदेश मागे घेतल्यानंतर सेवेत पदस्थापना देण्यासाठी लागलेला दि.२९.९.२००९ ते दि ०२.०६.२०१० हा नियुक्तीविना राहिलेला कालावधी महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्व साधारण शर्ती) नियम १९८१ मधील नियम ९ (१४) (फ) मधील तरतुदीनुसार सक्तीचा प्रतिक्षा कालावधी म्हणून नियमित करण्यात येत आहे. श्री.रशीद मुनीर शेख यांना उक्त कालावधीतील पुर्ण वेतन व भत्ते अनुज्ञेय होतील.

१०. श्री.रशीद मुनीर शेख , हे विभागीय वन अधिकारी (सामाजिक वनीकरण) ,उस्मानाबाद या पदावरून दि.३१/१०/२०१३ रोजी नियतवयोमानाने सेवानिवृत्त झाले आहेत. श्री.रशीद मुनीर शेख , सेवानिवृत्त विभागीय वन अधिकारी यांच्या देय ठरत असलेली रक्कम व त्यांना निलंबन कालावधीत अदा करण्यात आलेला निर्वाह

भत्ता याची परिगणना करुन त्यांना देय ठरणारी रक्कम अदा करण्याची कार्यवाही विभागीय वन अधिकारी (सामाजिक वनीकरण) उस्मानाबाद यांनी करावी.

११. सदर आदेश म.ना.से. (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन बडतर्फी आणि सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम, १९८१ मधील नियम ७२ (३) मधील तरतुदीनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

१२. सदर शासन आदेश, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०१९०९२१११०९३४५०१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Atul Ashok Kode

Digitally signed by Atul Ashok Kode
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a12403ed93b05957cb29b7e95265d3ac52d366233b80405514f23a879132aeec, serialNumber=f0d5ee4c99cc9cbfa8761b3ddc7bd6650bad33302f33a35400ad5aad2291371a, cn=Atul Ashok Kode
Date: 2019.09.21 11:04:35 +05'30'

(अतुल कोदे)
सह सचिव (वने)
महसूल व वन विभाग

प्रति,

श्री.रशीद मुनीर शेख, तत्का उप विभागीय वन अधिकारी, बीड
(प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्यामार्फत)

प्रत-

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मिक) ,नागपूर
३. मुख्य वन संरक्षक (प्रादे.) औरंगाबाद.
४. विभागीय वन अधिकारी (सामाजिक वनीकरण) उस्मानाबाद
५. महालेखापाल,महाराष्ट्र-२ (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र २,नागपूर
६. जिल्हा कोषागार अधिकारी, कोषागार कार्यालय, उस्मानाबाद
७. मा.मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव
८. मा.राज्यमंत्री (वने) यांचे खाजगी सचिव
९. प्रधान सचिव (वने) यांचे स्वीय सहाय्यक
१०.संबंधित अधिकारी / प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), म.रा.नागपूर यांचे मार्फत
११.निवड नस्ती (फ-८ कार्यासन).